उपसंचालक, आरोग्य सेवा, लातूर मंडळाच्या अधिपत्याखालील स्त्री रुग्णालय व नवजात अर्भक केंद्र, लातूर येथील ९४ अस्थाई पदे पुढे चालु ठेवण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः अपदे-२०१८/प्र.क्र.८५/आरोग्य-४
१० वा मजला, संकुल इमारत,
गो.ते. रुग्णालय आवार, मुंबई-४०० ००१,
तारीख: २० एप्रिल, २०१८.

वाचा

1. **सहसंचालक, आरोग्य सेवा, रूग्णालये (राज्यस्तर), मुंबई यांचे पत्र, क्र.संआसे/कक्ष-३/टे-५ अ/२०१८-१९/लातुर/अपदे/२२५२-५३/१८, दि.०३.०३.२०१७.**
2. **शासन निर्णय, सा.आ.वि., क्रमांकः अपदे-२०१७/प्र.क्र.३५/आरोग्य-४, दि.३१.०१.२०१८.**
3. **शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांकः पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दि.०५.०३.२०१८.**

शासन निर्णय

उपसंचालक, आरोग्य सेवा, लातूर मंडळाच्या अधिपत्याखालील स्त्री रुग्णालय व नवजात अर्भक केंद्र, लातूर येथील ९४ अस्थाई पदांना संदर्भाधीन क्रमांक २ येथील दि.३१.०१.२०१८ च्या शासन निर्णयान्वये दि.१.०१.२०१८ ते दि.२८.०२.२०१८ या कालावधीपर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती.

२. या शासन निर्णयान्वये उपसंचालक, आरोग्य सेवा, लातूर मंडळाच्या अधिपत्याखालील स्त्री रुग्णालय व नवजात अर्भक केंद्र, लातूर येथील यासोबतच्या विवरणपत्र "अ" येथील ९४ अस्थाई पदांना खालील अटींच्या अधीन राहून दि.१.०३.२०१८ ते दि.३०.०९.२०१८ या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात येत आहे.

1. उपरोक्त पदांपैकी कोणतेही पद ६ महिन्यापेक्षा जास्त काळ रिक्त नाही व ज्या कारणांसाठी पदे मंजूर केली आहेत त्या अटी व शर्तीचे पालन करण्यात आले आहे.
2. शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक-पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दि.०५.०३.२०१८ नुसार विहित करण्यात आलेल्या अटी व शर्तीचे कटाक्षाने पालन करण्यात यावे व त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी. त्याचप्रमाणे कार्यालयाचा पदविषयक सुधारित आकृतिबंध उच्चस्तरीय समितीकडून अंतिमत: मान्य करुन घेण्याबाबत तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.
3. विहीत मुदतीत पदांच्या आढाव्याची कार्यवाही पूर्ण न झाल्यास अस्थायी पदांना त्या पुढील कालावधीसाठी मुदतवाढ न मिळाल्यास व त्यामुळे अधिकारी / कर्मचारी यांच्या वेतन व भत्ताचा प्रश्न निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांची राहील.

या पदांवरील होणारा खर्च सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाच्या मागणी क्रमांक आर -१ मुख्य लेखाशिर्ष "२२१०-वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ०१-नागरी आरोग्य सेवा व विषम चिकित्सा, ११०- रुग्णालये व

दवाखाने, ११०-७- पंचवार्षिक योजनांतर्गत योजना- राज्य योजनांतर्गत योजना, (०६)(०१)- मुफसल क्षेत्रातील अध्यापनेत्तर शासकीय रुग्णालये व दवाखाने (२२१० ०२२६)"या लेखाशीर्षाखाली दर्शविण्यात यावा.

सदर शासन निर्णय, वित्त विभागाचा शासन निर्णय क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दि.०५.०३.२०१८ अन्वये प्रशासकीय विभाग प्रमुखांना प्रदान केलेल्या अधिकारात निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४२०१४३७१९५६१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pradip M Balkavde

Digitally signed by Pradip M Balkavde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8db6aab31faca2f1a89698a28c94703436c07cda664672d20607766dc59d345b, serialNumber=ed0fa40788bb5c0d7f76b869fa2e5835af215c6a80eae8f70eaf87b0cf68d63f, cn=Pradip M Balkavde
Date: 2018.04.20 15:23:22 +05'30'

(प्र.मो.बलकवडे)
अवर सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग,
महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल, १/२,महाराष्ट्र (लेखा व लेखा परिक्षा) (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर.
२. आयुक्त, आरोग्य सेवा तथा संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
३. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई
४. सहसंचालक, आरोग्य सेवा (रूग्णालये-राज्यस्तर), मुंबई.
५. सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन), पुणे.
६. सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (लेखा व लेखापरिक्षा), पुणे.
७. उपसंचालक, आरोग्य सेवा, लातूर मंडळ, लातूर.
८. जिल्हा शल्य चिकित्सक, लातूर
९. जिल्हा कोषागार अधिकारी, लातूर
१०.जिल्हा आरोग्य अधिकारी, लातूर
११.वित्त विभाग (व्यय-१३, अर्थसंकल्प-१९), मंत्रालय, मुंबई.
१२.अवर सचिव (सेवा-२/ सेवा-३/ सेवा-५ /अर्थसंकल्प), सा.आ.वि., मंत्रालय, मुंबई.
१३.निवडनस्ती (आरोग्य- ४).

विवरण पत्र "अ"

कार्यालयाचे नांव :- वैद्यकिय अधिक्षक स्त्री रुग्णालय,लातूर

अस्थाई पदे दि.०१.०३.१८ ते २८.०२.१९ या कालावधीसाठी पुढे चालू ठेवण्याचा प्रस्ताव

अ. क्र.	तात्पूरती पदे प्रथमतः ज्या शासन निर्णयाने मंजूर झाले तो शासन निर्णय क्रमांक व दिनांक	पदनाम	पदाची संख्या	वेतनश्रेणी	ज्या शासकिय आदेशान्वये शेवटी पदे पुढे चालु ठेवण्यात आली तो शानिक्र व दि.	ज्या तारखेपासनु पदे पुढे चालु ठेवायचे तो दिनांक	लेखाशीर्ष	पदे पुढे चालु ठेवण्याबाबतचे स्पष्टीकरण
१	२	३	४	५	६	७		८
स्त्री रुग्णालय व नवजात अर्भक केंद्र,लातुर								
१	शानिक्र.सा.आ. डीएचसी-२०१०/ प्र.क्र. १८८/आरोग्य-३, दि.०२.०२.२०११	वैद्यकीय अधिक्षक वर्ग-१	१	१५६००-३९१००	शासन निर्णय क्रमांकः अपदे -२०१७/प्रक्र ३५/आरोग्य -४ मंत्रालय मुंबई दिनांक २७ ऑक्टोबर २०१७	दिनांक ०१/०३/२०१८ पासुन	मुख्य लेखाशिर्ष/गौण शिर्ष २२१० वै.सेवा साआ मागणी क्र.०१ नागरी आरोग्य सेवा विषय चिकित्सा संकेतांक क्र.११०/०६ पंचवार्षिक योजनेंतर्गत योजना,राज्य योजनांतर्गत योजना (०६)(०१) मुफसल क्षेत्रातील अध्यापनेत्तर शासकीय रुग्णालय व दवाखाने २२१००२२६	लातुर व लातुर येथील परीसरातील रुग्णांना रुग्णसेवा सुरळीत देण्यासाठी सदर पदे पुढे चालु ठेवणे अत्यावश्यक आहेत.
२		वैदयकिय अधिकारी (स्त्रीरोग व प्रसुतीतज्ञ) वर्ग-१	१	१५६००-३९१००				
३		वैद्यकीय अधिकारी (बालरोगतज्ञ) वर्ग-१	१	१५६००-३९१००				
४		वैद्यकीय अधिकारी (बधिरीकरण) वर्ग-१	१	१५६००-३९१००				
५		वैद्यकीय अधिकारी (बधिरीकरण शास्त्रज्ञ)गट अ	२	१५६००-३९१००				
६		वैद्यकीय अधिकारी (बालरोगतज्ञ) गट अ	३	१५६००-३९१००				
७		वैदयकिय अधिकारी (स्त्रीरोग व प्रसुतीतज्ञ) गट-अ	३	१५६००-३९१००				
८		वैद्यकीय अधिकारी गट अ	५	१५६००-३९१००				
९		प्रशासकिय अधिकारी गअ-ब	१	९३००-३४८००				
१०		सहाय्यक अधिसेविका वर्ग-३	१	९३००-३४८००				
११		परिसेविका	५	९३००-३४८००				
१२		अधिपरीचारीका	२०	९३००-३४८००				
१३		बालरोग परिचारीका	८	९३००-३४८००				
१४		आहार तंज्ञ	१	९३००-३४८००				
१५		रक्तपेढी तंत्रज्ञ	२	९३००-३४८००				
१६		क्ष- किरण तंत्रज्ञ	२	९३००-३४८००				

१७	शानिक्र.सा.आ. डीएचसी-३०१०/ प्र.क्र. १८८/आरोग्य-३, दि.०२.०२.२०११	प्रयोगशाळा तंत्रज्ञ	२	९३००-३४८००	शासन निर्णय क्रमांक: अपदे -२०१७/प्रक्र ३५/आरोग्य -४ मंत्रालय मुंबई दिनांक २७ ऑक्टोबर २०१७	दिनांक ०१/०३/२०१८ पासुन	मुख्य लेखाशिर्ष/गौण शिर्ष २२१० वै.सेवा साआ मागणी क्र.०१ नागरी आरोग्य सेवा विषय चिकित्सा संकेतांक क्र.११०/०६ पंचवार्षिक योजनेंतर्गत योजना,राज्य योजनांतर्गत योजना (०६)(०१) मुफसल क्षेत्रातील अध्यापनेत्तर शासकीय रुग्णालय व दवाखाने २२१००२२६	लातुर व लातुर येथील परीसरातील रुग्णांना रुग्णसेवा सुरळीत देण्यासाठी सदर पदे पुढे चालु ठेवणे अत्यावश्यक आहेत.
१८		ईसीजी तंत्रज्ञ	१	९३००-३४८००				
१९		औषधनिर्माण अधिकारी	३	५२००-२०२००				
२०		प्रयोगशाळा सहायक	३	५२००-२०२००				
२१		भांडार तथा वस्त्रपाल	१	५२००-२०२००				
२२		कार्यालयीन अधिक्षक	१	९३००-३४८००				
२३		वरिष्ठ लिपीक	१	५२००-२०२००				
२४		कनिष्ठ लिपीक	२	५२००-२०२००				
२५		बाहयरुग्ण लिपीक	२	५२००-२०२००				
२६		बाहयरुग्ण सेवक	१	४४४०-७४४०				
२७		अपघात विभाग सेवक	३	४४४०-७४४०				
२८		रक्तपेढी परीचर	१	४४४०-७४४०				
२९		वृणोपचारक	१	५२००-२०२००				
३०		प्रयोगशाळा परीचर	१	४४४०-७४४०				
३१		शस्त्रक्रियागृह परीचर	२	५२००-२०२००				
३२		कक्षसेवक	१०	४४४०-७४४०				
३३		शिपाई वर्ग-४	२	४४४०-७४४०				
		एकुण	९४					